# हॅकॅथॉन कुशल तंत्रज्ञ घडविण्याचे व्यासपीठ

## डॉ. प्रवीण गेडाम : राष्ट्रीय हॅकॅथॉन स्पर्धेत हजारो स्पर्धकांचा सहभाग

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. ४ : हॅकॅथॉन थॉन ही स्पर्धा नसून कुशल तंत्रज्ञ घडवण्याचे व्यासपीठ आहे. संशोधन व तंत्रज्ञानाद्वारे नव-संशोधक विद्यार्थी सार्वजनिक समस्यांचे निरसन आणि विकासाला नवीन चालना देत राष्ट्रीय विकासात योगदान देऊ शकतात. तसेच विद्यार्थ्यांच्या आजचे संशोधन भविष्यात प्रशासन, सुरक्षितता आणि



सार्वजनिक सेवांसाठी मोलाचे असल्याचे नाशिकचे विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी सांगितले.

के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण आणि संशोधन महाविद्यालयात एक दिवसीय 'इनोव्ह-इरा २०२५' या राष्ट्रीय स्तरावरील हॅकॅथॉन स्पर्धाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी डॉ. गेडाम बोलत होते.

स्पर्धेचे पहिले वर्ष असून या स्पर्धेचे आयोजन अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या कॉम्प्युटर, आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स व कॉम्प्युटर सायन्स अँड डिझाइन विभागाच्या वतीने करण्यात आले. स्पर्धेत देशभरातील विविध राज्यातून १८१ टीम अंतर्गत १ हजार ०८६ स्पर्धकांनी सक्रीय सहभाग नोंदविला. त्यापैकी अंतिम फेरीसाठी २५ टीम मधील १२८ स्पर्धकांची निवड करण्यात आली. के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाने तीन पारितोषिक त्याचप्रमाणे संजीवनी अभियांत्रिकी महाविद्यालय (कोपरगाव) व संदीप विद्यापीठाने प्रत्येकी एक पारितोषिक जिंकले.

स्पर्धेचे उद्घाटन संगणक तज्ज्ञ व लेखक अतुल कहाते यांच्या उपस्थितीत तर पारितोषिक वितरण समारंभ विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्या हस्ते झाले.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, विश्वस्त अशोक मर्चंट, जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर व विभागप्रमुख डॉ. स्नेहल कमलापूर उपस्थित होते.

**Sakal 05-03-2025**